दि. १८ फेब्रुवारी , २०१४

ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे सुधारित व सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाज महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पासाठी सादर करीत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या कारकिर्दीतील हा माझा पहिलाच अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्प बनविणे हे केवळ जमा खर्चाचे विवरणपत्र तयार करण्याची प्रक्रिया नसून, शहराच्या विकासाची दिशा निर्धारित करण्यासाठी महापालिकेच्या संपूर्ण आकडेमोडीच्या विश्लेषणाबरोबरच समाजातील सर्व घटकांचा एकत्रित अभ्यास करुन ध्येय धोरणे निश्चित करुन त्यांची अंमलबजावणी करताना सर्वसामान्य नागरीकांना सुलभ व सहजरित्या महानगरपालिकेच्या सेवा सुविधा उपलब्ध करण्यासाठी तयार केलेली प्रणाली व पध्दत सुधारणेची संधी असते. म्हणून ठाणे शहरातील सामान्य नागरीक नजरेसमोर ठेवून त्यांना अधिकाधिक व चांगल्या प्रकारच्या नागरी सुविधा कशा देता येतील तसेच महानगरपालिकेचे कर भरताना येणा-या अडचणी, प्रशासकीय कार्यपद्धतीतील दोष व उणीवा दूर करुन कर भरण्याच्या पद्धतीत सुलभता आणून सर्वसामान्यांना महापालिकेबरोबर सुलभ व सरळ समन्वय साधता येईल यासाठी या प्रक्रियेत बदल आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक नागरिकाला महानगरपालिकेसंबंधीची माहिती तात्काळ मिळाल्यास कामकाजात पारदर्शकता येईल व जास्तीत जास्त लोकसहभाग होईल यासाठी कार्यालयीन कार्यपद्धतीत अमुलाग्र सुधारणा करण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी प्रत्येक विभागाच्या कामकाजाचे धोरण निश्चित करण्यांवर भर देण्यात आला आहे. तसेच कॉल सेंटर, मालमत्ता कराचा भरणा, स्थानिक संस्था कराचा भरणा करणेसाठी ऑन लाईन पेमेंटची सुविधा, नागरी सुविधा केंद्रामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन सुधारणा , स्थानिक संस्था कराच्या दराचे सुसूत्रीकरण, मालमत्ता कराची देयके स्वतंत्र करुन वाटप करणे इत्यादी कार्यालयीन कामकाजात गतिमानता आणणेसाठी ई ऑफिस प्रणाली, सर्व समावेशक संगणकीकरण (ERP) प्रणालीची अंमलबजावणी, GIS Cell ची निर्मिती, सर्व अभिलेख जतन करण्यासाठी आधुनिक तत्रज्ञानाद्वारे स्कॅनिंग, नागरिकांच्या तक्रारींचा जलद गतीने निपटारा

होणेसाठी संगणकीय प्रणाली विकसित करुन प्राधान्याने त्याची अंमलबजावणी करण्याचा मानस आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ९५ मधील तरतुदीनुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे रु. १६४६ कोटीचे सुधारीत आणि सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे रु. २१६६ कोटी चे मुळ जमा व खर्चाचे अंदाज सादर करण्यात येत आहेत.

## सन २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज :

सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये प्रस्तावित केलेली ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

**(रकमा कोटीत )**

| अ.क्रं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | आरंभिची शिल्लक | रु. ०.१२ |
| २. | महसुली उत्पन्न | रु. १५२५.०० |
| ३. | अनुदाने (जे.एन.एन.यु.आर.एम. व लाभार्थी हिस्स्यासह) | रु. ३०२.६९ |
| ४. | कर्ज (जे.एन.एन.यु.आर.एम.सह ) | रु. ३३८.१९ |
| | एकूण जमा (१ ते ४) | रु. २१६६.०० |
| ५. | महसुली खर्च | रु. १०७८.७४ |
| ६. | अ अंदाज भांडवली खर्च | रु. ५८९.१० |
| ७. | क अंदाज भांडवली खर्च | रु. ७८.३४ |
| ८. | जे.एन.एन.यु.आर.एम. भांडवली खर्च | रु. ४१९.५८ |
| ९. | अखेरची शिल्लक | रु. ०.२४ |
| | एकूण अंदाजखर्च ( ५ ते ९ ) | रु. २१६६.०० |

# सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये

- स्थानिक संस्था कराच्या दरांचे सुसूत्रीकरण
- आधुनिक तंत्रज्ञान पद्धतीने रस्त्यांचे मजबुतीकरण
- स्मशानभूमी विकासासाठी एकात्मिक कार्यक्रम
- आरोग्य सुविधांवर भर
- महापालिका विभागांच्या संगणकीकरणासाठी भरीव तरतूद
- निवारा निधीची (Shelter Fund) स्थापना
- अपंगांच्या स्वावलंबनासाठी अपंग कल्याणकारी धोरण
- महिला व बालकांच्या विकासासाठी नवीन योजना
- छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय सुधारणा कार्यक्रम
- माफक दरात डायलेसीस व सिटीस्कॅन सेवा
- मालमत्ता कर ऑन लाईन भरणेची सुविधा
- ऑटो डेबिट पेमेंटद्वारे मालमत्ता कर भरणा-यांना एक टक्का रिबेट
- पर्यावरणाभिमुख प्लॅटीनम लीड सर्टिफीकेट घेणा-या विकासकांना विकास शुल्कामध्ये ५% सूट
- ठाणे महानगरपालिकेचे प्रस्तावित क्रीडा धोरण
- तात्पुरते फलक, पोस्टर्स, बॅनर्सबाबतचे प्रस्तावित जाहिरात धोरण
- वाहतुक कोंडी टाळण्याकरीता पार्कींग धोरण
- शहरातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेच्या बळकटीकरणाअंतर्गत ठामपा परिवहन सेवेच्या बसेसमध्ये भरीव वाढ
- महानगरपालिकेची विविध कामे व खरेदीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी १००% निविदा प्रक्रियेचा अवलंब
- हुतात्मा पार्क, विज्ञान पार्क, थीम पार्क व स्मृती वन व इतर उद्याने विकसित करण्यावर भर
- सहज परवडणारी घरे उपलब्ध करणेसाठी धोरण

## महानगरपालिका महसुली उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत

१. **स्थानिक संस्था कर :** ठाणे महानगरपालिकेच्या एकूण महसुली उत्पन्नामध्ये जकात कर हा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत होता. महाराष्ट्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०१३ पासून ठाणे महानगरपालिकेमध्ये जकात कराऐवजी स्थानिक संस्था कर लागू केला आहे. स्थानिक संस्था कर हा लेखा पद्धतीवर आधारीत असून आयातिकांनी आयात केलेल्या मालाचे स्वंयमूल्य निर्धारण करुन कराची रक्कम चलनाद्वारे बँकेत भरणा करण्याची तरतूद आहे. चालू महिन्याचा स्थानिक संस्था कर पुढील महिन्याच्या २० तारखेपर्यंत भरणे बंधनकारक असल्याने स्थानिक संस्था करापासून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेस फक्त ११ महिन्यांचे उत्पन्न प्राप्त होणार आहे.

स्थानिक संस्था कर लागू करण्यास शहर व राज्य पातळीवर विविध व्यापारी संघटनांनी विरोध करण्यासाठी बाजारपेठा बंद ठेऊन सर्व व्यवहार ठप्प केले होते. व्यापा-यांच्या असहकाराच्या भुमिकेमुळे सुरुवातीच्या पाच महिन्यांच्या कालावधीमध्ये महसुलात फार मोठया प्रमाणात घट झाली ही वस्तुस्थिती आहे. व्यापा-यांच्या शिष्टमंडळाबरोबर वारंवार बैठका घेऊन त्यांच्या मनामध्ये असलेले गैरसमज दूर करुन तसेच वृत्तपत्राद्वारे जनजागृती करुन स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यास प्रवृत्त करण्याचे प्रयत्न करण्यात आले. व्यापा-यांच्या विविध संघटनांनी २% प्रमाणे स्थानिक संस्था कर भरण्याची विनंती केली व त्यानुसार जर विहीत वसुलीचे लक्ष्य पूर्ण न झाल्यास मंजूर दरातील फरक व त्यावरील व्याज

वसूल करावा अशी मागणी केली ती तत्वत: मान्य केली. परंतु व्यापा-यांनी मागणी केलेली योजना पूर्णपणे यशस्वी झाली नाही त्याचे प्रमुख कारण म्हणजे शहरातील काही व्यापा-यांनी या सकारात्मक भूमिकेला योग्य प्रतिसाद दिला नाही.

ठाणे शहराचा स्पर्धात्मक दर्जा (Competative edge) कमी होऊ नये आणि जे व्यापारी प्रामाणिकपणे स्थानिक संस्था कराचा भरणा करत आहेत त्यांना काही व्यापा-यांच्या अशा वाईट प्रवृत्तीची झळ बसू नये म्हणून प्रशासनाने स्थानिक संस्था कराचे पूर्वीचे ०.१%, ०.५०%, १%, १.५%, २%, २.५%, ३%, ३.५%, ४%, ५%, ७% असलेले दर सुधारीत करुन ०.२५%, ०.५%, २%, ३%, ४%, व ७% प्रमाणे शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आले आहेत. जे व्यापारी हेतुपुरस्सर स्थानिक संस्था कराचा भरणा करीत नाहीत त्यांच्या आस्थापनेवर धाडी घालून स्थानिक संस्था कराची वसुली करण्यात येत असून यापुढेही हे धाडसत्र असेच सुरु राहणार आहे.

स्थानिक संस्था करापासून डिसेंबर, २०१३ पर्यंत रु.४०७ कोटी उत्पन्न मिळवण्यात यशस्वी ठरलो आहोत. स्थानिक संस्था करापासून रु. ४५० कोटी व मुद्रांक शुल्क अधिभारापासून रु. ६० कोटी असे एकूण रु. ५१० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे. या आर्थिक वर्षात मार्गस्थ दाखला सुरु ठेवल्याने त्यापासून रु.५० कोटी, जकात कराची मागील वसुली रु.४.७१ कोटी असे एकूण रु. ५६४.७१ कोटी उत्पन्न सुधारीत अर्थसंकल्पात प्रस्तावित आहे.

आतापर्यंत ठाणे महापालिका हद्दीतील ३०,१०० व्यापारी आस्थापनांची नोंदणी प्रकिया पूर्ण झाली असुन उर्वरीत व्यापा-यांची नोंदणी प्रकिया सुरु आहे. शहरातील व्यापारी वर्गाच्या सोयीसाठी ऑनलाईन नोंदणी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आतापर्यंत महापालिकेने स्थानिक संस्था कर भरण्यासाठी सात बॅंकांची निवड केली असून त्यांच्या एकूण ६४ शाखांमध्ये कराचा भरणा करण्याची सुविधा देण्यात आली आहे. व्यापा-यांनी विहित मुदतीत कर जमा करावा यासाठी अलर्ट मेसेज व इ-मेल ची सुविधाही कार्यान्वित करण्यात आली आहे.

पुढील आर्थिक वर्षात स्थानिक संस्था कराचे उत्पन्न वाढविण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरविले आहे.

- सेवानिवृत्त अनुभवी शासकीय / निमशासकीय अधिकारी तसेच कर सल्लागार, विधी सल्लागार यांची नेमणूक करणे.
- व्यापारी आस्थापनाच्या वार्षिक विवरणपत्राचा जलद निपटारा करण्यासाठी तज्ञ व्यक्ती तसेच सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे.
- स्थानिक संस्था कर विभागाचे संपूर्णपणे संगणकीकरण करणे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मुद्रांक शुल्क अधिभारासह स्थानिक संस्था करापोटी **रु. ६५० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे.

**२. मालमत्ता कर** : मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे महत्वाचे स्त्रोत असून त्यामध्ये व्यापक सुधारणा करण्याची गरज होती. त्यासाठी महापालिका क्षेत्रामध्ये जी.आय.एस. मॅपींगद्वारे सर्व मिळकतींचे सर्व्हेक्षण सुरु करण्यांत आले होते. त्यानुसार दिवा व शीळ प्रभागातील सर्व्हेक्षण वगळता सर्व प्रभागांतील सर्व्हेक्षणाचे काम जवळपास पूर्ण करण्यांत आले आहे.

मालमत्ता कराच्या कामकाजामध्ये अधिक गतिमानता व सुसूत्रता येण्याच्या दृष्टीकोनातून आणि नागरिकांना मालमत्ता कर भरण्याची प्रक्रिया सुलभ व सोईची होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच महापालिकेच्या मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी पुढील बाबींवर अधिक भर देण्यांत येणार आहे.

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना ऑनलाईन प्रणालीद्वारे मालमत्ता कर व पाणी बिले भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची बिले ही जी. आय.एस. प्रणालीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यांत येतील.
- सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासुन, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतींना, मिळकतींना मालमत्ता कराचे एकत्रित बिल बजाविण्यांत येत आहे, अशा मिळकतीमधील नोंदणीकृत सोसायटीने अथवा जी सोसायटी नोंदणीकृत नाही त्या सोसायटीतील ५०% पेक्षा जास्त सभासदांनी मालमत्ता कराची स्वतंत्र बिले मिळण्यासाठी अर्ज

केल्यास, अशा मिळकतींना / इमारतींना मालमत्ता कराची स्वतंत्र बिले देण्यांत येतील. तसेच ज्या मिळकतींची मालमत्ता कराची थकबाकी असेल ती थकबाकी कोणत्या मिळकतींची आहे याबाबत मिळकतधारकामध्ये मतैक्य झाल्यास व थकीत मिळकतींची नावे कळविल्यास अशा सोसायटीतील मालमत्ताधारकांना स्वतंत्र बिले देण्यात येतील.

तथापि, उपरोक्तप्रमाणे मालमत्ता कराची स्वतंत्र बिले देण्यापूर्वी सदर मिळकतीच्या करयोग्य मूल्याच्या १% इतके प्रशासकीय शुल्क आकारण्यांत येईल.

- जे मालमत्ताधारक Auto Debit Payment प्रणालीमार्फत मालमत्ता कर भरतील त्या मालमत्ताधारकाना मालमत्ता करामध्ये शासकीय कर वगळून एक टक्का रिबेट देण्यांत येईल.

- सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात शासनाच्या टपाल कार्यालयाने (POST OFFICE) अनुकुलता दर्शविल्यास मालमत्ता कराची बिले टपाल कार्यालयामार्फत वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.

- भाडेतत्वाने दिलेल्या मिळकतीवर करण्यात येणा-या कर आकारणीमध्ये समानता येण्यासाठी अधिकृत करारनाम्यातील (Authorised Agreement) वार्षिक भाडयाच्या ३० टक्के इतके भाडे करयोग्य मूल्य म्हणून निश्चित करण्यांत आले आहे. तथापि, भाडयाने दिलेल्या मिळकतींची माहिती जे मिळकतधारक देणार नाहीत अशा

मिळकती भाडेतत्वाने दिल्याचे निदर्शनास आल्यास त्या तारखेपर्यंत ( त्यावेळी मिळकत भाडेकरारनामा दिल्याची मुदत संपली असली तरीसुद्धा) करारनाम्यामध्ये असलेल्या भाडयाच्या ६० टक्के इतके भाडे करयोग्य मूल्यासाठी विचारात घेण्यात येईल.

- सध्या मालमत्ता कर आकारणी करणेचे निकष हे वार्षिक करयोग्य मुल्यावर अवलंबून आहे आणि हे वार्षिक करयोग्य मुल्य भाडे नियंत्रण कायदयातील तरतुदीमुळे वाढविणे शक्य नाही. मालमत्ताकरामध्ये वृध्दी करण्याचा एकमेव उपाय म्हणजे कराच्या दरात वाढ करणे. आतापर्यंत याच पद्धतीने करांचे दर वाढविणेत आल्याने आता हे दर अतार्किक (illogical) झालेले आहेत. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे नवीन मालमत्ता धारकांवर असलेला बोजा कमी करण्यासाठी आणि मालमत्ता कराचे सुसुत्रीकरण करण्यासाठी भांडवली मुल्यावर आधारित कर प्रणाली राबविणे ही काळाची गरज आहे. पण हे करतांना जुन्या मालमत्ता धारकांच्या मालमत्ता करामध्ये अवाजवी वाढ होणार नाही ही दक्षता घेऊन करणेची असून ही प्रक्रिया महसूल स्थिर (Revenue neutral) ठेवून त्या दिशेमध्ये वाटचाल करण्याचा प्रयत्न असेल.

- भांडवली मुल्याधारित करप्रणालीबद्दल असलेले संभ्रम आणि गैरसमज दूर करण्यासाठी, करदात्यांना पूर्णपणे विश्वासात घेऊन सोपी, सुटसुटीत स्वयंमुल्यांकन पद्धती

राबविण्यांत येईल व या पद्धतीत किती कर येणार आहे यासाठी अतिशय सोपे कॅलक्युलेटर मोबाईल व संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यांत येईल. आपल्या करदात्यांना सुलभ व तर्कसंगत अशी पद्धत उपलब्ध करुन देणे आपले कर्तव्य असून यासाठी महासभेपुढे प्रशासनाची विनंती राहील.

वार्षिक करयोग्य मुल्यावर आधारीत कर प्रणालीच्या ऐवजी भांडवली मुल्यावर आधारीत कर प्रणाली राबविणे हा बदल Revenue Nuetral ठेवण्याचा प्रस्तावित असल्यामुळे या बदलापोटी मालमत्ता कर वसुलीमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ दर्शविण्यात आली नाही.

- सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात सर्व मालमत्तांच्या करयोग्य मूल्यावर २ टक्के दराने निवारा अधिभार (Shelter Cess) आकारुन ही रक्कम या अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित निवारा निधीत जमा करण्यात येणार आहे. निवारा निधीचा विनियोग शहरी गरीबांसाठी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी करण्यात येईल.

- महापालिकेने मालमत्ता कराच्या थकबाकीपोटी ज्या इमारती नाममात्र एक रुपये या दराने ताब्यात घेतल्या असतील, अशा मिळकतींबद्दल लिलावाच्या दिवशी असलेली थकबाकी जर त्या इमारतीतील काही ठराविक मालमत्तेवर असेल आणि उर्वरीत मालमत्ताधारकावर नाही असे सिध्द झाल्यास, ज्या मालमत्ताधारकावर थकबाकी नाही त्या मालमत्ताधारकांना ती मिळकत परत करुन फक्त थकबाकी असलेल्या मालमत्ता

महापालिकेच्या नावावर ठेवण्यात येतील. अशा थकीत मालमत्तेची घसारा वजा जाता उर्वरीत किंमत (Depreciated value) किंवा थकीत मालमत्ता कराची व्याजासह थकबाकी यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम घेऊन पुर्ण मालमत्ता महानगरपालिका संबंधितांस परत करेल असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मालमत्ता करापासून रु.३११.३१ कोटी उत्पन्न अपेक्षित होते ते सुधारीत करुन रु.२८९.७१ कोटी अपेक्षित धरण्यात आले आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर, फी व शासकीय कर मिळून एकुण **रु. ३३५.५९ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे.

**३. विकास व तत्सम शुल्क :**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात शहर विकास विभागाकडून विकास व तत्सम शुल्कापोटी रु.३४३ कोटी उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक भूखंड भाडे करारापासून रु. ३० कोटी अपेक्षित होते परंतु याबाबतची कार्यवाही पूर्ण न झाल्याने हे उत्पन्न प्राप्त होऊ शकले नाही. त्यामुळे शहर विकास विभागाकडून रु. २८६.१३ कोटी सुधारीत उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. मूळ अर्थसंकल्पात विकास व तत्सम शुल्कापोटी रु.२६२ कोटीचे अंदाज आयुक्तांनी प्रस्तावित केले होते.

शहर विकास विभागामार्फत जमा होणा-या विकास शुल्काच्या २% दराने निवारा अधिभार (Shelter Cess) आकारुन तो निवारा निधी जमा करुन त्याचा विनियोग शहरी

गरीबांसाठी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी करण्यांत येईल.

मा.महासभेच्या मान्यतेने विकास नियंत्रण नियमावली अनुसूची डब्ल्यू मध्ये बदल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून जर मालकाकडून काही आरक्षणे कन्स्ट्रक्शन टि.डी.आर. च्या मोबदल्यात बांधून घेतल्याने महापालिकेस नवीन प्रिमियम प्राप्त होत असून हा उत्पन्नाचा नवीन स्त्रोत निर्माण झाला आहे. यावर्षी या स्त्रोतातून रु.५ कोटी उत्पन्न अपेक्षित धरले असून याचा विनियोग बांधून घेतलेल्या सुविधांचा योग्य वापर होण्यासाठी आवश्यक असलेली उपकरणे, सामुग्री इत्यादी वर करण्यात येणार आहे.

पर्यावरणाभिमुख Smart इमारती बनविणा-या विकासकांनी Platinum Leed Certificate प्राप्त केल्यास त्यांना विकास शुल्कामध्ये ५% सुट देण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात शहर विकास विभागाकडील विकास शुल्क व तत्सम आकारापासून **रु.३५५ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे.

**४. पाणी पुरवठा आकार :** पाणी पुरवठा सेवा ही ना-नफा ना-तोटा तत्वावर चालविणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत पाणी पुरवठा विभागाला अर्थसहाय्य देऊन शहराला पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन २०१४-१५ च्या अंदाजित आकडेवारीचे विश्लेषण केल्यावर लक्षात येईल की, पाणी पुरवठयावर एकूण खर्च रु.२४४.२९ कोटी तर त्यातून उत्पन्न रु.१४१.४६ कोटी अंदाजित आहे. सन २०१३-१४ मध्ये एकूण उत्पन्न रु.८० कोटी अपेक्षित आहे. तर पाणी खरेदीवर आपला खर्च रु.७५ कोटी

आहे. असे असले तरी, पाणी पुरवठा सेवा सर्व नागरीकांना माफक दराने देणे मनपाचे मुलभूत दायित्व असल्यामुळे पाणी पुरवठयामध्ये यावर्षी कोणतीही थेट वाढ सुचविण्यात आलेली नाही. पण प्रत्येक वर्षी वाढणारा खर्च आणि सेवेचा स्तर कायम ठेवण्यासाठी लागणा-या निधी बद्दल विचार करता दरवर्षी दरवाढ न करता काही वर्षानंतर पाणी पुरवठा आकारामध्ये एकाचवेळी दरवाढ केल्यास नागरीकांना एकदम आर्थिक भार सोसावा लागतो व महापालिकेस नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागते ही वस्तुस्थिती आहे. हे टाळण्यासाठी व सदर सेवा स्वावलंबी बनविण्यासाठी विज आकार, कच्चे पाणी व कर्मचा-यांच्या वेतनामध्ये वेळोवेळी ज्या प्रमाणात बदल होईल त्या प्रमाणात पाणी पुरवठा आकारामध्ये बदल करण्यात येईल व यासाठी विज आकार, कच्चे पाणी (Raw Water) व कर्मचारी वेतन यांचे दर हे माहे १ एप्रिल २०१४ रोजीचे आधारभूत दर धरण्याचे प्रस्तावित आहे.

यामुळे मागील दरवाढीपासून १ एप्रिल २०१४ पर्यंत झालेल्या खर्चाची वाढीचा बोजा ग्राहकांवर न लादता ही वाढ महापालिका निधी मधूनच सोसावी लागणार आहे आणि विजेचे दर किंवा कच्च्या पाण्याच्या दरामध्ये कपात झाली तर दर कमी होतील आणि या खर्चात वाढ झाली तर त्या प्रमाणात पाण्याचे दर वेळोवेळी सुधारित होतील.

पाण्याचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी आणि जबाबदारीने वापर करण्यास नागरीकांना प्रवृत्त करणेसाठी पाणी पुरवठा मिटरप्रमाणे करणे गरजेचे आहे. यावर्षी प्रथम

वाणिज्य वापरासाठी असलेला पाणी पुरवठा संपूर्णपणे मीटरद्वारे करण्यात येईल. हे AMR मीटर असतील ज्यामुळे मीटर रिडींग ॲटोमेटीक घेतले जातील आणि लागणा-या मनुष्यबळात बचत होईल व पाणी चोरुन वापरण्यावर नियंत्रण येईल. दुस-या टप्प्यात रहिवाशी संकुल आणि इतर इमारतींना सुध्दा मीटरद्वारे पाणी देणे प्रस्तावित करण्यात येत असून नागरिकांमध्ये पाणी काटकसरीने वापराबाबत जागरुकता निर्माण होऊन त्यांना वापरानुसारच पैसे भरावे लागतील. यामुळे पाणी वापरातील अपव्ययामध्ये घट होऊन Non Revenue Water कमी होणार आहे. तसेच जे ग्राहक शहराच्या सरासरीपेक्षा कमी पाण्याचा वापर करीत आहेत त्यांचेसाठी सवलतीचा दर आणि जे ग्राहक सरासरीपेक्षा जास्त वापर करीत आहेत त्यांचेसाठी वाढीव दर, ही संकल्पना राबविणे शक्य होईल. या वर्षी मिटरींग पध्दतीचा कार्यक्रम यशस्वी झाला तर Cross Subsidy प्रमाणे दरामध्ये सुसूत्रीकरण करणे शक्य होईल.

शहरात जरी मुबलक प्रमाणात पाण्याची उपलब्धता असली तरी, शहराच्या काही भागात उदा. घोडबंदर येथे पाणी पुरवठयाची वितरण व्यवस्था नसल्यामुळे योग्य रितीने पाणी पुरवठा होत नाही. पाणी पुरवठामधील आर्थिक तुट लक्षात घेता तसेच आस्थापना खर्च सर्वसाधारणपणे अनुज्ञेय टक्केवारीपर्यंत (३५%) असल्यामुळे पाणी पुरवठा विभागातील कर्मचा-यांची वाढीव पदे निर्माण करणे अशक्य होत आहे. त्यामुळे या भागाची वितरण व्यवस्था बळकट करुन परिचालनासाठी स्टेम कंपनीला ना नफा ना तोटा या पध्दतीने

वर्ग करण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा आकारापोटी **रु.१०५ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे.

**५. अग्निशमन विभागाकडील फी :**

अग्निशमन विभागाकडून रु. ३०.६३ कोटी उत्पन्न मूळ अंदाजपत्रकात अपेक्षित धरण्यात आले होते. यामध्ये वाढ झाली असल्याने **रु. ४०.७६ कोटी** सुधारीत उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार महापालिका हद्दीतील उंच रहिवाशी इमारती तसेच व्यावसायिक इमारतींच्या आराखडयांची अग्नी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अग्निशमन विभागामार्फत छाननी केली जाते. अशा इमारतीना फायर प्रिमियम चार्जेस व फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस आकारण्यात येतात. यापासून **रु. ४३.५० कोटी** उत्पन्न अपेक्षित आहे.

अग्निशमन विभागामध्ये सुसूत्रता येण्यासाठी व अग्नी सुरक्षिततेसाठी फायर मॅन्युअल तयार करण्यात आलेले आहे. त्यामुळे अग्निशमन विभागाचे काम अधिक प्रभावशाली होण्यास मदत होईल.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम, २००६ चे कलम ११ अन्वये तरतूद करण्यात आलेली अग्निशमन सेवा फी आकारण्यास प्रस्तावित करण्यात येत असून, सदर फी पोटी अंदाजे **रु.५० लक्ष** उत्पन्न अपेक्षित आहे.

**६. रस्ता खोदाई फी** : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात रस्ता खोदाई फी पासून रु.४० कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते ते अपेक्षित केल्याप्रमाणे प्राप्त होणार आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रस्ता खोदाई फी पासून **रु. १५ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

**७. जाहिरात कर** : ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये तात्पुरत्या व कायम स्वरुपी अनधिकृत होर्डींग्समुळे शहराचे विद्रुपीकरण होत असल्यामुळे त्यावर आळा घालण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात लावण्यात येणारे तात्पुरते फलक, पोस्टर्स, बॅनर्सबाबतचे धोरण प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेल व अनधिकृत जाहिरातींवर आळा बसेल. या धोरणानुसार प्रत्येक अधिकृत होर्डींगचे आरक्षण इंटरनेटद्वारे करण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात जाहिरात करापोटी अपेक्षित केलेले उत्पन्न रु.६.९४ कोटी प्राप्त होणार आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात जाहिरात करापोटी **रु. ८.८९ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

**८. घनकचरा सफाई आकार** : सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून मोठया प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांकडून त्या कच-याच्या विल्हेवाटीसाठी लागणारा खर्च वसूल करणे तार्कीकदृष्टया योग्य आहे. यासाठी अशा आस्थापनांकडून सेवा आकार वसुल करणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

निवासी संकुलांकडून कोणताही सेवा आकार वसुल करणे प्रस्तावित नाही.

| | | |
|---|---|---|
| ९. | **निवारा निधीची स्थापना** | ठाणे शहरात मागील काही वर्षांमध्ये इमारती कोसळण्याच्या दुर्घटना घडल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने गोरगरीब जनतेची आर्थिक व जिवित हानी झाली आहे. गरीबीमुळे नाईलास्तव नागरिक अनधिकृत व धोकादायक इमारतींमध्ये राहतात. त्यांना अधिकृत घरे उपलब्ध करुन देण्यासाठी बी.एस.यु.पी, राजीव आवास योजना या सारख्या शासनाच्या विविध योजनांमध्ये महापालिका सहभागी होऊन वेगवेगळे प्रकल्प राबवित आहे. या व्यतिरिक्त सर्वांना परवडणारी घरे उपलब्ध होण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये योग्य ते बदल प्रस्तावित करण्यात आले आहेत. या बदलामध्ये प्रामुख्याने एस.आर.डी. मध्ये बदल, क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी तरतूद, टी.डी.आर संदर्भातील नियमांमध्ये बदल, तसेच झोनल एफ.एस.आय.मध्ये ३३% ची वाढ हया बाबींचा समावेश आहे. वर उल्लेखित काही योजनांची अंमलबजावणी करतांना महानगरपालिकेला अतिरिक्त निधीची आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी निवारा निधी ची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे. सन २०१४-१५ मध्ये निवारा निधीची स्थापना करुन त्यामध्ये सर्व मालमत्तांच्या करयोग्य मूल्यावर २%, विकास शुल्कावर २% तसेच बी.एस.यु.पी, एस.आर.ए., एस.आर डी, MMRDA ¸ëüटल हौसिंग योजना, पी.पी.पी. तत्वावरील बांधकाम, Cluster Devlopment इत्यादी योजनांतर्गत प्राप्त होणारे शुल्क या निधीमध्ये जमा करण्यात येईल असे प्रस्तावित करण्यात येत आहे. निवारा निधीचा विनियोग शहरी गरीबांसाठी घरे उपलब्ध करुन |

देण्यासाठी करण्यांत येईल.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात निवारा निधीत **रु.२० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

**१० अनुदाने** : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी रु.२६९.६० कोटी अनुदान अपेक्षित होते. परंतु आतापर्यंत प्रत्यक्षात रु.६३.१३ कोटी प्राप्त झालेले अनुदान व JNNURM अंतर्गत कामांची प्रगती पहाता सुधारीत अंदाजपत्रकात रु.१७१.८२ कोटी अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात "अ" व "क" अंदाजपत्रकामध्ये रु. ३२.८७ कोटी , JNNURM अंतर्गत प्रकल्पांसाठी रु. २६९.८२ कोटी असे एकूण **रु. ३०२.६९ कोटी** केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे.

**११. कर्जे** : सन २०१३-१४ मध्ये कर्ज घेण्याची आवश्यकता भासण्याची शक्यता कमी असल्यामुळे मुळ अंदाजपत्रकात असलेली रु.३४५.५८ कोटी तरतूद कमी करुन ती रु.३९.८२ कोटी अशी सुधारीत करण्यात आलेली आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अ अंदाजपत्रकामध्ये रु. २०० कोटी , JNNURM अंतर्गत प्रकल्पांसाठी १३८.१९ कोटी असे एकूण **रु.३३८.१९ कोटी** कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे. परंतु कामाची प्रगती व निधीच्या आवश्यकतेनुसारच कर्ज घेण्याचे प्रयोजन आहे. बी.एस.यु.पी. साठी हुडको या संस्थेकडून कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध होणार असल्याने आवश्यकता भासल्यास सदरचे कर्ज हुडको

कडून घेण्यांत येईल. तसेच परिवहन सेवेसाठी JNNURM अंतर्गत बसेस खरेदीसाठी बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयीकृत बँकेचे व्याजदर तुलनात्मकरित्या लघुत्तम असल्याने त्यांचेकडून कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे.

## सुधारीत अर्थसंकल्प कमी होण्याची कारणे

- महापालिका उत्पन्नात येणारी रु.१६४.६१ कोटी तूट, JNNURM अंतर्गत प्रस्तावित अनुदान प्राप्त न झाल्याने रु.९७.७८ कोटी तूट व JNNURM अंतर्गत व भांडवली कामांची प्रगती पाहता कर्ज घेण्याची आवश्यकता नसल्याने रक्कम रु३०५.७६ कोटी कमी झाल्याने सुधारीत अर्थसंकल्पातील जमा बाजूकडे महापालिका उत्पन्न रु.१३२० कोटी, अनुदान रु.१७१.८२ कोटी, कर्ज रक्कम रु.३९.८२ कोटी व आरंभिची शिल्लक रु. ११४.३६ कोटी अपेक्षित धरुन एकूण **रु.१६४६ कोटी** जमा प्रस्तावित करण्यात येत आहे.

## सन २०१३-१४ चे सुधारित अंदाज

**( रकमा कोटीत )**

| अ.क्र. | तपशील | सन २०१३-१४ चे मूळ अंदाज | सन २०१३-१४ चे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महापालिका उत्पन्न | १४८४.६० | १३२०.०० |
| २ | अनुदाने | २६९.६० | १७१.८२ |
| ३ | कर्ज | ३४५.५८ | ३९.८२ |
| ४ | आरंभिची शिल्लक | ०.२९ | ११४.३६ |
| | **आरंभिच्या शिल्लकेसह एकूण** | **२१००.०७** | **१६४६.००** |

| अ.क्र. | तपशील | सन २०१३-१४ चे मूळ अंदाज | सन २०१३-१४ चे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| ५ | महसुली खर्च | ९४७.९८ | ९०३.४६ |
| ६ | भांडवली खर्च (अ+क अंदाज) | ८६३.०४ | ६१३.१४ |
| ७ | भांडवली खर्च (JNNURM) | २८८.६० | १२९.२८ |
| ८ | एकूण भांडवली खर्च (६+७) | ११५१.६४ | ७४२.४२ |
| | **एकूण खर्च (५+८)** | **२०९९.६२** | **१६४५.८८** |
| | **अखेरच्या शिल्लकेसह एकूण** | **२१००.०७** | **१६४६.००** |

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महत्वाकांक्षी प्रकल्पांना मान्यता दिली असून सदर प्रकल्पांवरील खर्च हा पुढील आर्थिक वर्षात होणार असून शक्यतो नवीन कामे हाती न घेता या आर्थिक वर्षात मंजूरी मिळालेली कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील.

**महापालिकेमार्फत पुरविल्या जाणा-या अनुदानित सेवा :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अ अन्वये सन २०१२-१३ मध्ये अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबतचा सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे. सद्यःस्थितीत पुढील महत्वाच्या सेवा अनुदानीत पद्धतीने पुरविल्या जातात. या सेवांपासून सन २०१४-१५ मध्ये अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च विचारात घेऊन अपेक्षित अर्थसहाय्याची रक्कम पुढीलप्रमाणे.

**( रकमा कोटीत )**

| सेवा | सेवेवरील अपेक्षित खर्च | सेवेपासून अपेक्षित उत्पन्न | अर्थसहाय्याची / तोटयाची रक्कम |
|---|---|---|---|
| पाणी पुरवठा | २४४.२९ | १४१.४६ | १०२.८३ |
| घनकचरा व्यवस्थापन | १६२.३० | १७.१४ | १४५.१६ |
| रस्त्यावरील दिवाबत्ती | ४४.४१ | ०.०० | ४४.४१ |
| प्राथमिक शिक्षण | १०५.२८ | १७.०० | ८८.२८ |

| सेवा | सेवेवरील अपेक्षित खर्च | सेवेपासून अपेक्षित उत्पन्न | अर्थसहाय्याची / तोटयाची रक्कम |
|---|---|---|---|
| आरोग्य सेवा | ७४.८० | १.८० | ७३.०० |
| छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय | ७०.१४ | ४.०० | ६६.१४ |
| राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय | ३३.५० | १.१० | ३२.४० |
| मलनिःसारण | ४०.१५ | ४४.१२ | ०.०० |
| अग्निशमन | ३०.५७ | ४४.१३ | ०.०० |
| नाटयगृह | ७.३६ | २.६४ | ४.७२ |
| क्रीडाप्रेक्षागृह | १२.४२ | ०.६० | ११.८२ |
| तरणतलाव | ४.४३ | १.१६ | ३.२८ |

## महानगरपालिका महसुली व भांडवली खर्च

**I नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण :**

**१. महापालिका हद्दीतील रस्त्यांचे यु.टी.डब्ल्यु.टी. पद्धतीने सिमेंट कॉंक्रीटीकरण :**

ठाणे महानगरपालिका हद्दीत एकूण ३५६.४० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे जाळे असून, यापैकी ७५.०३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण / यु.टी.डब्ल्यु.टी.पध्दतीने कॉंक्रीटीकरण करण्यात आलेले आहे व सुमारे ३५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत २४७.०० कि.मी. लांबीचे रस्ते डांबरी स्वरुपात आहेत.

ठाणे महानगराची भौगोलिक परिस्थिती ही एका बाजूस डोंगर व दुस-या बाजूस खाडी असून, जमिनीतील पाण्याची पातळी, एकूण पडणारे पावसाचे प्रमाण यामुळे डांबरी रस्ते जास्त काळ टिकत नाहीत, ही वस्तुस्थिती लक्षात घेता दिर्घकाळ टिकणारे व पावसाळयात नागरीकांना कमीत कमी त्रास होईल,

अशा प्रकारचे रस्ते करण्याची आवश्यकता लक्षात घेता, यु.टी.डब्ल्यु.टी. व सिमेंट कॉंक्रीटीकरणाद्वारे रस्ते तयार करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प ठाणे महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आला आहे.

या प्रकल्पामध्ये १०४ कि.मी. लांबीचे एकूण रस्त्यांचे यु.टी.डब्ल्यु.टी. पद्धतीने सिमेंट कॉक्रीटीकरण करण्यात येणार असून, सदरचा प्रकल्प हा डिफर्ड पेमेंट पध्दतीनुसार हाती घेण्यात येत आहे. यामध्ये रस्त्यांचे Edge-to-Edge प्लॅनींग करण्यात आले आहे. या प्रकल्पाचा बांधकाम कालावधी हा ३ वर्षे असून, ३ वर्षानंतर पुढील ५ वर्षाची देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी ही कंत्राटदारावर असणार आहे. या प्रकल्पासाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत प्रथमच " गुणवत्ता व मुल्याधारित निवड " निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर प्रकल्पासाठी देखभाल दुरुस्तीसह एकूण रु.९७०.३५ कोटी खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे नागरीकांना चांगल्या दर्जाचे रस्ते मिळतील व विशेषत: पावसाळयातील खड्डयांचा त्रास कमी होण्यास मदत होईल.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.१०० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**२. रस्ता रुंदीकरण व नुतनीकरण :**

सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये ठाणे महानगरपालिकाक्षेत्रातील अस्तित्वातील १३३ कि.मी. लांबीच्या मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण (आधुनिक तंत्रज्ञान पध्दतीने) रस्त्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत ११०.२६ किमी (२०१ रस्ते) लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम पुर्ण करण्यात

आले असून, उर्वरीत रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम मार्च-२०१४ पर्यंत पुर्ण करण्यात येणार आहे.

तसेच सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ४१ चौकांचे मास्टीक अस्फाल्ट पध्दतीने डांबरीकरणाची कामे हाती घेण्यात आली असून, सदरची कामे मार्च-२०१५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.५७ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**३. कळवा खाडीवर पूल** :

ठाणे शहर आणि कळवा यांना जोडण्यासाठी तसेच ठाणे शहरामधून नवी मुंबई, कोकण, पुणे इ.कडे ठाणे बेलापूर मार्गे जाण्यासाठी ठाणे आणि कळवा दरम्यान खाडीवर सुमारे शंभर वर्षापूर्वीचा ब्रिटीशकालीन पूल अस्तित्वात आहे. तसेच शेजारी सन १९९५-९६ च्या दरम्यान नवीन पूल बांधण्यात आला त्याचा वापर सध्या सुरु आहे. तथापि सप्टेंबर २०१० मध्ये जुन्या पूलाच्या कमानीचे काही दगड निखळून पडल्यामुळे तसेच सदर पूलाचे आयुष्यमान संपल्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने या पूलावरुन होणारी संपूर्ण वाहतूक बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतुकीसाठी सन १९९५-९६ च्या दरम्यान बांधण्यात आलेल्या नवीन पूला शिवाय पर्याय नसल्यामुळे नवीन कळवा पूलावर तसेच पूलाचे दोन्ही बाजूचे चौकामध्ये प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी खाडीवर नवीन कळवा पूलाशेजारी साकेत कडील बाजूस आणखी अतिरिक्त पूल बांधण्याचे कामाचा प्रस्ताव लोकप्रतिनिधींचे मागणीनुसार प्रशासनामार्फत तयार करण्यात आलेला आहे.

या कामी तज्ञ सल्लागारांचे कडून आराखडे प्राप्त झालेले आहेत. प्राप्त अहवालावर सविस्तर विचार करुन सदर

नियोजित नवीन पूल हा अस्तित्वातील पूलाचे उत्तरेकडील बाजूस (साकेत कडील बाजूस) बांधून या कामा बरोबरच सदर पूलाचे जोडरस्त्यांचा भाग असलेला कळवा शिवाजी चौक ते पुढे खारीगांव पर्यंत असणारा नियोजित विकास आराखडयानुसार ३० मी. रुंदीचा आणि ३.२० किमी लांबीचा रस्ता विकसीत करण्यात येणार आहे. सदर पूलाखाली व खारेगांव-रेतीबंदर सर्कल पर्यंत रस्ता विकसीत झाल्यावर कळवा भागातील वाहतुकीचा प्रश्न ब-याच अंशी सुसहय होईल. तसेच या भागाची सर्वांगीण प्रगती होण्यास मदत होईल.

या कामापैकी कळवा पूलाचे बांधकामासाठी सदर कामी तज्ञ सल्लागाराने तयार केलेल्या आराखडयानुसार येणा-या रु.१८१.१९ कोटींचे अंदाजखर्चास मा.महासभेची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु असून सदरचे काम आगामी ३ वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. १७ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

४. **पादचारी पूल** : पूर्व द्रुतगती महामार्ग तसेच घोडबंदर रस्ता पादचा-यांना सुरक्षितपणे ओलांडता यावा म्हणून पुर्व द्रुतगती महामार्गावर आनंदनगर व ज्युपिटर हॉस्पिटल येथे पादचारी पूलाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. तसेच घोडबंदर रस्त्यावर तत्वज्ञान विद्यापीठ रस्त्याजवळ, आर मॉल जवळ, ब्रम्हांड जंक्शन व कासारवडवली (साईनाथ क्रॉस रोड) या ठिकाणी पादचारी पूल बांधणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असून सदरचे काम मार्च २०१५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. याव्यतिरिक्त ग्लॅडी अल्वारीस रस्त्यावरील वसंत विहार जंक्शन येथे भुयारी

पादचारी मार्ग बांधण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. १० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**५. ठाणे (पूर्व )रेल्वे स्थानक सुधारणा प्रकल्प :**

ठाणे स्टेशन (पूर्व) येथे स्टेशन बाहेरील रेल्वे सर्क्युलेटिंग एरीयाचा विकास करुन त्यापासून होणा-या उत्पन्नाचा वापर ठाणे रेल्वे स्टेशन करीता करणेचा मुंबई रेल्वे विकास कॅार्पोरेशन लि.यांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

ठाणे पूर्व भागातून टी.एम.टी., बेस्ट, मिरा-भाईंदर या महानगरपालिकांच्या सार्वजनिक बसेस या भागातून आवागमन करतात. या व्यतिरिक्त वागळे इस्टेट येथे जाणा-या खाजगी कंपनीच्या कर्मचा-यांसाठी असलेल्या बसेस या भागातूनच ये-जा करतात. यामुळे या ठिकाणी सद्यस्थितीत वाहतूकीची कोंडी होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे महापालिकेमार्फत ठाणे (प) प्रमाणे ठाणे पूर्व येथे सुध्दा सॅटीस (II) सारखा प्रकल्प उभारणेची अत्यावश्यकता आहे.

यामध्ये नवीन कोपरी पूलाच्या बाजूस नव्याने एक ROB बांधून ५.५० मी. उंचीवर तीन मार्गिकांचा ठाणे स्टेशन पूर्व पर्यंत Elevated Road बांधण्यात येईल. त्या ठिकाणी मुंबई रेल्वे विकास कॅार्पोरेशन लि. मार्फत प्रस्तावित Commercial complex मध्ये ५.५०मी. उंचीवरील डेकवर सदरचा Elevated corridor विलीन होईल व सदर ठिकाणी अंदाजे १०००० चौ.फूट.चा डेक एरीया तयार करण्यात येईल. या डेक एरीया पुढे लोकमान्य टिळक मार्ग - कृष्णा बोरकर मार्ग, दोन मार्गिकांचा Elevated पूर्व द्रुतगती महामार्ग ओलांडून आनंदनगर बाजूस

उतरविण्यात येईल. ज्ञानसाधना कॅालेजजवळ दुसरा ROB बांधण्यात येईल.

सदरचा Elevated Road (बस कॅारीडॅार) फक्त सार्वजनिक वाहतूकीसाठी राहील. भविष्यात सदरचा मार्ग HCMTR / BRTS ला जोडण्यात येईल.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. १० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**६. मिसिंक लिंक** : ठाणे महानगरपालिका हद्दीतील घोडबंदर परिसरात मोठया प्रमाणात निवासी व वाणिज्यिक संकुले विकसित होत आहेत. विकसित होत असलेल्या परिसरामध्ये रस्त्यांचे सुनियोजित जाळे विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळे मुख्य मार्गावरील वाहतुक ब-याच प्रमाणावर कमी करता येईल. या करीता प्रशासनाने मंजूर विकास योजनेतील विकसित झालेल्या रस्त्यांना जोडणा-या रस्त्यांचा म्हणजे मिसिंक लिंकचा विकास करण्याचा प्रस्ताव हाती घेण्यात आला आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात एकुण १० मिसिंग लिंक (८.२७ कि.मी.) विकसित करण्याकरीता आराखडा तयार करण्यात आला होता. त्यापैकी एकुण ६ मिसिंक लिंक (५.९२ कि.मी.) विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले असून, त्यापैकी ३.०१ कि.मी. रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे. उर्वरीत काम सन २०१४-१५ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.५.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**७. पार्कींग प्लाझा व पार्किंग धोरण अंमलबजावणीत सुधारणा.** :

ठाणे शहरासाठी मा.महासभेने पार्कींग धोरण मंजूर केले असून त्यानुसार सन २०१४-१५ या वर्षात रस्त्यावर पार्कींग लॅाटचे मार्कींग करण्यात येणार आहे. तसेच महापालिका भवन समोर कचराळी तलावशेजारी दोनस्तरीय कार पार्कींग करुन ३० गाडयांसाठी सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. या व्यतिरीक्त योग्य ठिकाणी पे - अॅन्ड पार्क घोषित करुन पार्किंग आकार वसुलीची यंत्रणा Web Based करण्याची व Smart Hand Held Devices मार्फत करण्याची योजना प्रस्तावित आहे.

**८. खारेगाव लेव्हल क्रॉसींगवर आर.ओ.बी.** :

खारेगाव येथील मध्य रेल्वे लाईनवर आर.ओ.बी. बांधणेबाबत महानगरपालिकेने संपुर्ण ड्राईंग डिझाईनसह अंदाजखर्च तयार करुन रेल्वे विभागाकडे मंजुरीसाठी सादर केला होता, सदर प्रस्तावास रेल्वे विभागाने मान्यता देऊन रेल्वे विभागामार्फत आर.ओ.बी. बांधण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. रेल्वे हद्दीबाहेरील पुलाच्या जोडरस्त्याचे काम ठाणे महानगरपालिका करणार असून, या आर्थिक वर्षामध्ये सदर काम सुरु करण्यात येईल.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**९. मास रॅपीड ट्रान्झीट सिस्टिम** :

ठाणे शहरात वाहतुकीच्या उपलब्ध व्यवस्थेवर मोठया प्रमाणात होत असलेला ताण लक्षात घेता यापुर्वी केलेल्या विविध वाहतुक अभ्यासात काढण्यात आलेले निष्कर्ष व सुचविण्यात आलेले मार्ग याचा विचार करुन शहराच्या क्षेत्रातील वाहतुकीसाठी

एल.आर.टी, मोनो, मेट्रो, बी.आर.टी.एस. पैकी एक किंवा संमिश्र यंत्रणा उभारणे अत्यंत निकडीचे झालेले आहे. यापूर्वी आनंदनगर ते ओवळा या मार्गावर पुर्वेकडील बाजूस असलेल्या सर्व्हिस रोडवर अंदाजे १० कि.मी. लांबीच्या मार्गावर कासारवडवली पर्यंत प्रथम टप्प्यात मास रेल ट्रांन्झीट (एल.आर.टी) योजना राबविण्याचे प्रस्तावित असून, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामी तज्ञ सल्लागारांची नेमणुक करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

याबरोबरच ठाणे शहराच्या विकास आराखडयात HCMTR / MRTS ( High Corridor Mass Transit Route / Mass Rapid Transit System) चा अंतर्भूत करुन यापैकी काही जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली आहे. या आराखडयाप्रमाणे मोनो किंवा मेट्रो किंवा बी.आर.टी.एस यंत्रणा उभी करण्यासाठी महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेबरोबर चर्चा करुन या दिशेने ठोस पावले उचलण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. १.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१०. लोकसहभागातून प्रकल्प**

विकास आराखडयामध्ये फार मोठया प्रमाणात आर.जी., पी.जी., अंतर्गत जागा आरक्षित असून त्या जागा टि.डी.आर च्या माध्यमातून महानगरपालिकेला प्राप्त होत असून त्या जागा विकसित करुन लोकांना सेवा पुरविणे गरजेचे आहे. तसेच त्या जागांचा विकास न केल्यास त्या जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु सद्यस्थितीत ही जागा विकसित

करण्यासाठी लागणारा निधी आपल्या अर्थसंकल्पातून उपलब्ध करुन देणे शक्य नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता मोठया भुखंडांचा विकास बी.ओ.टी किंवा पी.पी.पी माध्यमातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. ही पध्दती अवलंबिताना कोणत्याही परिस्थितीत सर्वसामान्य नागरीकांना महापालिकेच्या माफक दरात सेवा सुविधा मिळविण्याचा अधिकार कमी (Dilute) होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी खालील तीन प्रकारच्या पध्दती अवलंबिता येतील.

१) BOT with VGF ( Viability Gap Funding) upto 40%

२) भूखंडाच्या ७०:३० प्रमाणे विभाजन करुन ३०% वर खाजगी अभिकर्त्यांना access control देणे आणि ७०% क्षेत्रावर महानगरपालिकेचा access control ठेवणे.

३) Construction TDR च्या माध्यमातून भूखंड विकसित करुन घेणे व प्राप्त प्रिमियम त्याच भूखंडावर दुरुस्ती व देखभालीवर खर्च करणे.

या सर्व सुविधांचे स्वरुप पाहता यावर तिकीट लावणे गरजेचे असेल त्यामुळे सेवा सुविधा देण्यावर वाढीव भर पडेल.

११. **ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुकीचे सर्व्हेक्षण करुन त्यातुन उपाययोजना उपलब्ध करणेसाठी सविस्तर अभियांत्रिकी अभ्यास करणेबाबत.** :

ठाणे महानगरपालिका क्षेत्र हे १२८ चौ.कि.मी. असून, २८३ कि.मी. एवढे रस्त्यांचे जाळे आहे. सद्यस्थितीत ठाण्यामधून मुंबई, नवीमुंबई, मुंबईपोर्ट ट्रस्ट, नाशिक, घोडबंदर रस्त्यावरुन अहमदाबादकडे अवजड वाहतुक सुरु आहे. या बरोबरच महापालिका क्षेत्रातील अंतर्गत वाहतुक ज्यामध्ये ट्रक्स, चार चाकी हलकी - मध्यम वाहने, दुचाकी, ऑटोरिक्षा, खाजगी बसेस व टीएमटी, बेस्ट, एनएनएमटी बसेस इ. वाहनांचा समावेश आहे,

याची संख्या मोठया प्रमाणात वाढल्याने ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात वाहतुकींची कोंडी होत आहे.

यासाठी शहरातील अस्तित्वातील रस्त्यांचे जाळे व भविष्यातील विकासाच्या अनुषंगाने होणारे रस्ते, अस्तित्वातील ट्राफिक व्हॉल्यूम काऊंट, ट्रॅव्हल टाईम सर्व्हे, अस्तित्वातील सिग्नल फेजींग आणि टाईमिंग, अस्तित्वातील पार्किग व्यवस्था, वन -वे, नो - एन्ट्री या सर्व बाबींचा Computer Based Micro Simulation आधारे सविस्तर अभियांत्रिकी अभ्यास करुन त्यावर उपाययोजना तयार करणे आवश्यक आहे. यामध्ये संपुर्ण ठाणे शहरातील अस्तित्वातील वाहतुकीचा व भविष्यातील वाढणा-या वर्दळीचा अभ्यास करणे प्रस्तावित आहे. सदर अभ्यास करताना लि असोसिएटच्या माध्यमातुन एमएमआरडीए व ठाणे महानगरपालिका क्षेत्र यासाठी केलेल्या इंटीग्रेटेड मोबिलीटी प्लॅन मध्ये प्रस्तावित केलेल्या उपाययोजना देखील विचारात घेण्यात येणार आहेत.

या करीता सविस्तर अभियांत्रिकी अभ्यास करणेसाठी टीओआर ( Term of Referances ) तयार करुन त्यासाठी आधुनिक सिम्युलेशनद्वारे वाहतूक अभियांत्रिकी अभ्यास करणेकरीता निःष्णात व अनुभवी संस्था नियुक्त करणेकरीता निविदा मागविणेची प्रक्रिया सुरु आहे. सदरचा खर्च रस्ता रुंदीकरणाअंतर्गत तरतूदीमधून करण्याचे प्रस्तावित आहे.

**१२. महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांची निगा व देखभाल**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील १८ मीटर पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांच्या निगा व देखभालीसाठी प्रभाग समिती निहाय रु.१.७५ कोटी प्रमाणे नऊ प्रभाग समिती निहाय तरतूद प्रस्तावित

करण्यात आली आहे. ज्या रस्त्यांची रुंदी १८ मीटरपेक्षा जास्त आहे व यापैकी ज्या रस्त्यांचा दोष दायित्व कालावधीमध्ये समावेश नाही अशा रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीची कामे प्रभाग समिती निहाय करण्यात येणार आहेत. यामध्ये रस्त्याची देखभाल दुरुस्ती, पेंटींग, लेन मार्किंग, फुटपाथ, गटार, डिव्हायडर, ग्रील, कर्बस्टोन इत्यादींची दुरुस्ती, नव्याने स्पीड ब्रेकर तयार करणे व अस्तित्वातील स्पीड ब्रेकरची दुरुस्ती, रस्त्यालगतच्या झाडांवर सिमेंट पेंटने रंगरंगोटी करणे तसेच रस्त्यामधील चौकांची निगा व देखभाल इत्यादी कामाचा समावेश असणार आहे. त्यामुळे ठाणे शहरातील मुख्य रस्त्यांच्या सौंदर्यीकरणात भर पडेल.

## II सामाजिक पायाभूत सुविधा :

**१. भूसंपादन** : भूसंपादनासाठी **रु. २० कोटीची** तरतूद करण्यांत आली आहे. सदर निधिचा विनियोग विकास आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी करण्यात येईल.

**२. प्रभाग कार्यालये** : सन २०११-१२ मध्ये हाती घेण्यात आलेल्या कळवा प्रभाग समिती कार्यालयाच्या इमारतीचे तळ अधिक तीन मजल्यांचे बांधकाम या आर्थिक वर्षामध्ये पुर्ण करण्यात आले असून, सदरचे बांधकाम कार्यालयीन वापरासाठी व नागरीकांसाठी खुले करण्यात आलेले आहे.

मुंब्रा प्रभाग समिती कार्यालय हे सध्या एका निवासी इमारतीमध्ये असून ते गैरसोयीचे व धोकादायक झालेले आहे. याकरीता मुंब्रा प्रभाग समिती करीता प्रभाग कार्यालय बांधण्याची नितांत आवश्यकता असल्याने या आर्थिक वर्षात सदरचे कार्यालय बांधण्याचे प्रस्तावित आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. १.५७ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**३. मार्केट बांधणे** : सन २०११-१२ या आर्थिक वर्षात हाती घेण्यात आलेल्या बेसमेंट, तळ अधिक दोन मजल्याच्या गावदेवी मार्केटचे बांधकाम प्रगतीपथावर असून मार्च - २०१४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर इमारतीच्या बसेमेंटमध्ये २५० दुचाकी वाहन पार्किंगची सुविधा असून, तळ मजल्यावर भाजी मार्केट करीता (१५४ स्टॉल व १० गाळे) व्यवस्था करण्यात आलेली आहे. पहिल्या व दुस-या मजल्याचा बहुउद्देशीय वापर करण्याचे प्रस्तावित आहे. या लेखाशिर्षांतर्गत सन २०१३-१४ साठी **रु. १.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**४. कत्तलखाना बांधणे** : सन २०११ या आर्थिक वर्षात हाती घेण्यात आलेल्या अद्ययावत कत्तलखान्याचे बांधकाम ८०% पुर्ण झाले असून, उर्वरीत बांधकाम मार्च-२०१४ पर्यंत पुर्ण होणार आहे. या लेखाशिर्षांतर्गत **रु. १६ लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**५. शाळा बांधणे** : ठाणे महानगरपालिकेमार्फत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शाळा इमारती बांधण्याचे काम सन २००८-०९ पासून हाती घेण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत एकूण १० इमारतींचे बांधकाम हाती घेण्यात आले असून, त्यापैकी ८ इमारतींचे बांधकाम पुर्ण करण्यांत आले असून, २ शाळा इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. पुर्ण झालेल्या इमारतींमध्ये १०२ वर्ग खोल्या तयार करण्यात आल्या असून, शैक्षणिक वापराकरीता विद्यार्थ्यांसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. कळवा, विटावा

(स्टील्ट अधिक चार) व मुंब्रा कौसा (तळ अधिक तीन) येथील शाळेच्या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून, विटावा शाळेमध्ये १४ वर्ग खोल्या व कौसा शाळेमध्ये ४४ वर्ग खोल्या तयार होणार असून, सदरचे बांधकाम सन २०१४-१५ या वर्षात काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. २ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

६. **डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना** : या योजनेअंतर्गत महापालिकेतील सफाई कामगारांसाठी भाईंदरपाडा येथे २३४ सदनिका व माजीवडा येथे ५६ सदनिका याप्रमाणे एकूण २९० सदनिकांचे (२६९ चौ.मी.क्षेत्रफळ) बांधकाम प्रगतीपथावर असून, सदरचे बांधकाम मार्च-२०१४ पर्यंत पुर्ण होण्याचे नियोजन असून, पात्र सफाई कामगारांना महानगरपालिकेमार्फत मोफत सदनिका उपलब्ध होतील.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. ७ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

७. **कौसा व प्रादेशिक क्रिडा संकुल** : मुंब्रा -कौसा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रादेशिक क्रिडा संकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर असून, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पुर्ण करण्यात येणार आहे. या लेखाशिर्षांतर्गत **रु. २० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

८. **ढोकाळी मिनी क्रीडा संकुल** : पहिल्या व दुस-या टप्प्यामधील हाती घेण्यात आलेल्या ढोकाळी येथे मिनी क्रीडा संकुलाचे तळ अधिक एक मजल्याचे बांधकाम पुर्ण करण्यात आले असून, तिस-या टप्प्यातील आऊट डोअर स्पोर्ट कॉम्प्लेक्सचे बांधकाम मार्च २०१४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. इन-डोअर स्टेडियम अंतर्गत तळ

मजल्यावर बॅड मिंटन कोर्ट व पहिल्या मजल्यावर प्ले स्टेशन रुम, रिडिंग रुम, विव्हींग गॅलरी, टेबल टेनिस, कॅरम व चेस रुम इ. सुविधा उपलब्ध आहेत. तसेच आऊट डोअर गेम अंतर्गत २ टेनिस कोर्टस् व १ बासकेट बॉल कोर्ट, जॉगींग ट्रॅक इ. सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. ७.४२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**९. हिंदुह्दय सम्राट शिवसेना : प्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधकाम**

इटर्निटी मॉलच्या शेजारी आरक्षित असलेल्या सुविधा भुखंडावर हिंदुह्दय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याचे प्रस्तावित आहे. सदर स्मारकामध्ये पिरॅमिडआकाराची इमारत, अॅनेक्स इमारत, रिक्रिएशन ग्राऊंडचे बांधकाम करण्यांत येणार आहे. या स्मारकामध्ये आर्ट एक्झिबिशन्स, गॅलरी डिस्प्ले, ऑक्शन्स, कॉन्फरन्स स्पेसेस, मेडिटेशन, योगा स्पेसेस, विहित कालावधीसाठी लाईट आणि साऊंड शो, प्रशासकिय कार्यालय, ए.व्ही.रुम, कॅफेटेरिया, किचन, स्टाफ रुम्स व रेस्टरुम्स्, व्यंगचित्र दालन (कॅरिकेचर आणि आर्ट गॅलरी), वाचनालय व इत्यादी बाबींचा समावेश आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.३.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१०. राष्ट्रीय फेरीवाला धोरण**

राष्ट्रीय फेरीवाल धोरण २००९ नुसार ठाणे महानगरपालिकेने शहर फेरीवाला समितीचे गठन केले आहे.

फेरीवाल्यांसाठी नोंदणी फी रु.१०००/- (एक हजार मात्र) व दरमहा आकार रु.६००/- ठरविण्यात आला आहे. लवकरच फेरीवाल्यांची नोंदणी करण्याची प्रक्रीया सुरु करण्यात येणार

असून नोंदणी साठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

शहर फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही आताच सुरु करण्यांत आली असून फेरीवाला धोरणाच्या अंतर्गत प्राप्त होणारा महसूल या धोरणाच्या अंमलबजावणीसाठीच वापरण्यात येईल व फेरीवाल्यांसाठी सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात येतील.

**११. इमारतींचे हेल्थ कार्ड**

नजिकच्या काळात इमारत कोसळण्याच्या दुर्घटना व त्यामुळे होणारी जिवीत व वित्त हानी विचारात घेता इमारतींची नियतकालिक तांत्रिक तपासणी (Structural Audit) होऊन त्याप्रमाणे त्यांची दुरुस्ती केल्यास इमारतीच्या आयुष्यात वाढ होऊन नागरिकांना धोका कमी होईल. त्यासाठी इमारतींचे हेल्थ कार्ड ठेवून त्यामध्ये इमारतीबाबतच्या सर्व नोंदी ठेवल्यास त्याचा तपशील उपलब्ध होऊन त्याद्वारे वेळीच उपाययोजना करणे शक्य होईल.

## III शहर पर्यावरणामध्ये सुधारणा :

**१. एकात्मिक तलाव : सौदर्यीकरण**

ठाणे महानगरपालिकेमार्फत शहरातील सर्व तलावांचे संवर्धन, जतन व सुशोभिकरणाचे कामकाज केले जाते. राज्यशासनाकडून आलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेत नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ३६ तलावांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमातील मार्गदर्शक तत्वानुसार तलावांचे संवर्धन व जतन करण्यासाठी खालील बाबींचा समावेश सविस्तर प्रकल्प अहवालात करण्यात

आला आहे.

१) तलावातील पाण्याचे शुध्दीकरण करण्यासाठी आवश्यकतेनुसार डिसिल्टींग, बायो रिमेडिएशन, फिल्टर्स, एअरेशन, कारंजे व मॉनिटरींग रुम इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

२) कॅचमेंट एरीआ ट्रिटमेंट प्लान्ट, स्टॉर्म वॉटर ड्रेन्स, सिल्ट ट्रॅप्स इत्यादी बांबीचा समावेश आहे.

३) लेक एज ट्रिटमेंट- यासाठी बंड वॉल्स, पिचिंग, वेट लॅन्ड व्हेजिटेशन फेन्सिंग चा समावेश आहे.

४) लेक फ्रंट ईको डेव्हलपमेंट - किऑस्क जॉगिंग ट्रॅक (सिंथेटिक रबराईज्ड किंवा रस्टिक टाईल्स ग्रीन लॉन सह), ॲन्फी थिएटर, गाजिबोझ इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

५) नॉन पॉईंट सोर्सेस ऑफ पोल्युशन- सार्वजनिक शौचालय, कृत्रिम विसर्जन घाट, रीटेंशन पॉंड इत्यादी सुविधांचा समावेश आहे.

सद्यसिस्थितीत महापालिकेच्या निधीतून कचराळी तलाव, ब्रम्हाळा तलाव, कळवा शिवाजी नगर तलाव, खारेगाव तलाव, हरिओमनगर तलावाच्या सुशोभिकरणाची कामे नियोजित आहेत. सदर ३६ तलावांच्या सुशोभिकरणाच्या कामाकरिता रु. ६५.१३ कोटी एवढा अंदाजखर्च अपेक्षित असून शासनाकडून निधी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर काम सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन आर्थिक वर्षात प्रस्तावित आहे. सदर काम माहे मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु. ८ कोटी** तरतूद प्रस्तावित

करण्यांत आली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | **एकात्मिक नाले विकास प्रकल्प** | : | ठाणे महानगरपालिकेमार्फत जे.एन.एन.यु.आर.एम. प्रकल्पाच्या टप्पा क्र.१, २, व ३ अंतर्गत आता पर्यंत ८५.८५ कि.मी. नाल्याची बांधकामे पुर्ण करण्यात आली असून, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिका निधी मधून, ११.५० कि.मी. लांबीची कामे हाती घेण्यात आली असून ही सर्व कामे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.<br>या लेखाशिर्षांतर्गत **रु. ५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. |
| ३. | **हरित ठाणे प्रकल्प -उद्यान विकास** | : | **स्मृती वन :-** पारसिक हील येथील पार्क आरक्षणाच्या जागेत स्मृती वन विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये लोकसहभागातून एखादया व्यक्तीच्या स्मरणार्थ वृक्षांची लागवड व अन्य आकर्षक सुविधा उभारुन अद्ययावत उदयान विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.<br>**हुतात्मा पार्क :-** कोलशेत येथील पार्क ५ या भूखंडावर हुतात्मा पार्क विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये थोर नेत्यांचे पुतळे व अद्ययावत वृक्षांची, शोभेची, फुलांची झाडे, हिरवळ लागवड करुन उद्यान विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.<br>**सायन्स पार्क :-** खाजगी लोकसहभागातून ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर ६ मौजे कासारवडवली कावेसर येथील पार्क ३ या भूखंडावर सायन्स पार्क विकसीत करणेचे प्रस्तावित आहे. सदर सायन्सपार्क मध्ये विविध प्रकारच्या माहितीपर म्हणजेच जैविक, भौतिक, रासायनिक |

शास्त्रांबद्दलची माहिती, प्रात्यक्षिके दाखविण्याची प्रयोगशाळा - मॉडेल्स, सायन्स लॅब, वाचनालय इ. सुविधा उपलबध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

**थीम पार्क :-** लोकसहभागतून रुणवाल प्लाझा येथील आप्पा साहेब पवार उदयानात मिनी ट्रेन व ४-डी शोसह, बॉलिवुड थीम पार्क विकसित करणेचे प्रस्तावित आहे. तसेच घोडबंदर रोड, चितळसर मानपाडा येथील पार्कच्या आरक्षित भुखंडावर मिनी ठाणे या संकल्पनेवर थीम पार्क विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठाणे सिटी पार्क :-** कोलशेत येथील आरक्षित भुखंडावर ठाणे सिटी पार्क विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर भुखंडापैकी ३०% भुखंड हा विकासकास अनुज्ञेय बाबींसाठी देण्यात येत असून ७०% भुखंडावर क्रीडा विषयक माहितीपट, जागतिक स्तरावरील खेळाडूंची माहिती विविध प्रकारचे खेळ, लँडस्केप गार्डन इ. प्रकारच्या सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे.

उद्यान विभागासाठी एकूण **रु.१९.२५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

४. **वृक्षप्राधिकरण** : वृक्ष प्राधिकरणामध्ये झाडे लावणे व निगा तसेच रोपवाटिका विकास इ. कामांसाठी ३.३० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

- विकासकांना झाडे तोडण्यासाठी परवानगी देताना अनामत रक्कम स्विकारण्यात येते. या रक्कमेचा ब-याचवेळा परतावा घेण्यात येत नाही. या रकमेतून महापालिका क्षेत्रात छोटी उद्याने विकसित करणेसाठी

नगरसेवकांसाठी राखून ठेवलेल्या निधीमधून ५०% रक्कम उपलब्ध करुन दिल्यास या निधीतून उरलेली ५०% रक्कम उपलब्ध करुन देण्यांत येईल. अशा प्रत्येक कामाचा अंदाजखर्च रु.१० लक्ष पर्यंत असेल.

**५. घनकचरा व्यवस्थापन :** :

**१.** शहराची स्वच्छता राखण्यासाठी, नागरिकांना स्वच्छतेविषयी जाणीव करुन देणे व स्वच्छतेबाबत उपद्रव करणाऱ्या विरुध्द दंडात्मक कारवाई करणेसाठी उपविधी मंजूर करुन घेण्यात आलेली असून उपविधीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर कारवाई सुरु करण्यात येईल.

**२.** शहरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे

**३.** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणा-या घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तळोजा येथे उभारण्यात येणाऱ्या सामाईक भुमी भराव प्रकल्पामार्फत करणेस मा.महासभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुढील कारवाई प्रशासनामार्फत सुरु आहे.

तळोजा येथे उभारण्यात येणाऱ्या सामायिक भूमी भराव प्रकल्पास करारनाम्याप्रमाणे कचरा पुरवठा करुन उर्वरित कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेसाठी डायघर येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प (वेस्ट टु एनर्जी) उभारण्याबाबत कारवाई चालू आहे.

४. शहरामध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याची नियोजित ठिकाणापर्यंत वाहतुक करणेसाठी हस्तांतरण स्थानक विकसित करणे (जागा उपलब्धतेनुसार) विचाराधीन आहे.

घनकचरा विभागात भांडवली लेखाशिर्षांतर्गत **रु.१.४० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**IV पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कार्यक्रम :**

**१. सौर शहर** : महापालिका क्षेत्रात उभारण्यांत येत असलेल्या इमारतींमध्ये "ग्रीन बिल्डिंग " संकल्पनेचा मोठया प्रमाणात वापर होण्याच्या दृष्टीने ठाणे महापालिकेतर्फे विविध उपक्रम राबविण्यांत येणार असून त्या अंतर्गत महापालिका क्षेत्रात विकासकाने "Plantinum" रेटिंगची इमारत उभी केल्यास ५% व Gold रेटिंगची इमारत उभी केल्यास ३% विकास शुल्कात सूट देण्याचे प्रस्तावित आहे.

**ग्रीनी बिल्डींग :-** शहरातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी सौर ऊर्जेचा वापर, वॉटर हार्वेस्टींग व विजेचा वापर कमी होणेसाठी जी गृहसंकुले सहभाग घेतील अशा अस्तित्वातील गृहसंकुलांना मालमत्ता करातून ५% सुट देण्याचे तसेच ग्रीनी बिल्डींग म्हणून प्रमाणपत्र देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. हे प्रमाणपत्र इमारतीच्या दर्शनी भागावर लावण्याची मुभा असेल. सदर योजना राबविताना विज वापर ठराविक युनिटपेक्षा कमी असण्याची आवश्यकता राहील.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

२. **विज बचत उपाय योजना** : महापालिकेच्या पथदिपांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता व पर्यावरणाभिमुख तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टिने पारंपारिक सोडियम व्हेपर दिव्यांच्या ऐवजी LED तंत्रज्ञानाचा वापर करुन सुरु करण्यात आलेला आहे. चालू आर्थिक वर्षा अखेर ५००० LED पथदीप लावण्याचे काम पूर्ण करण्यात येणार असून पुढील आर्थिक वर्षामध्ये १०००० LED पथदिवे हे BOT च्या माध्यमातून पुर्ण करण्याचे योजिले आहे.

३. **प्रदुषण नियंत्रण** :

- ग्रिनी द ग्रेट कॅरेक्टर हे ब्रॅण्ड वापरुन पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती करणे
- फ्लोटिंग वेट लॅण्ड पद्धतीने सिद्धेश्वर , दिवा, दातिवली व डावला तलावाचे शुद्धीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.
- निर्माल्यापासून खत निर्मिती प्रकल्प ५ वर्षासाठी निगा व देखभालीसह करण्याचे प्रस्तावित आहे.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## V सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती :

१ **प्राथमिक शिक्षण** : ठाणे महानगरपालिका प्राथमिक शिक्षणाच्या एकूण १२४ शाळा व कार्यालयासह एकूण १२४३ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

१२४ शाळांमधून शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या ३२८७७ असून यापैकी १५९८५ मुले व १७२९८ मुली असून त्याचेप्रमाण ४८:५२ असे आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व उत्कर्ष तसेच त्यांच्यात

अध्ययन भावना विकसित करण्याकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत शालेय उपक्रम तसेच विविध शैक्षणिक व कल्याणकारी योजना राबविण्यांत येतात. यामध्ये मुलांना पौष्टीक आहार, शालेय गणवेष, दप्तर , शैक्षणिक साहित्य इ. शालोपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्यांत येतो. त्याच बरोबर विविध स्पर्धा, परिक्षा, प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. प्राथमिक शिक्षण मंडळासाठी आस्थापना खर्चासह एकूण **रु.१०५ कोटी २८ लक्ष** तरतूद करण्यातआली आहे.

अर्थसंकल्पीय वर्षात पोषण आहाराचा दर्जा सुधारणेसाठी प्रायोगिक तत्वावर एका प्रभाग समितीमध्ये इस्कॉन किंवा तत्सम संस्थेस पोषण आहार पुरविणेचे काम देण्याचा मानस आहे.

२ **माध्यमिक शिक्षण** :

- **नवीन शाळा :** सन २०१३ पर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या दहा मराठी व तीन उर्दु माध्यमाच्या माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. महापालिका हद्दीतील मुलांकरिता किसननगर, सावरकरनगर येथे एकुण दोन इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळा सुरु करणे तसेच कळवा प्रभाग समिती अंतर्गत मराठी माध्यमाची एक शाळा सुरु करणे, शाळेकरिता जागेची व्यवस्था, सध्या उपलब्ध असलेल्या प्राथमिक शाळेच्या इमारतीमध्ये करण्यात येईल.

- **साक्षरता अभियान :** महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील चतुर्थश्रेणी संवर्गातील सफाई कामगारांना अक्षर ओळख करण्यासाठी स्वाक्षरी साक्षरता अभियान अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील NGO यांच्या सहकार्याने ज्या सफाई

कामगारांना अक्षर ओळख नाही अशा कर्मचा-यांना ३ महिने प्रशिक्षण देऊन त्यांना साक्षर करणे जेणेकरुन ४ थ्या महिन्यात वेतन घेताना त्यांनी स्वाक्षरी करुन वेतन घेणे अपेक्षित आहे. अन्यथा दरमहा रु.१००/- त्यांचे वेतनातुन वसुल करणेत येतील. प्रत्यक्ष ज्या महिन्यात सदर कर्मचारी स्वाक्षरी करुन वेतन घेतील त्या महिन्यापासुन कपात न करता यापूर्वी कपात केलेली रक्कम त्यांना परत देण्यात येईल असे प्रस्तावित आहे.

- महानगरपालिकेच्या सर्व शाळांचे टप्प्या टप्प्याने संगणकीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.

**३ आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा :**

- केंद्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयासाठी नोंदणी करण्यात आली असून त्या अंतर्गत रुग्णसेवा लवकरच सुरु करण्यात येणार आहे.
- शस्त्रक्रिया विभागासाठी व्हिडीयो एंडोस्कोप हे उपकरण खरेदी करण्यात येणार आहे.
- २० वर्षापासून कार्यरत असणा-या लॉंड्री व निर्जंतुकीकरण विभागाचे नविन यंत्रे व यंत्रणा बसवून अंदाजे ३ कोटी ७३ लक्ष रूपयांमध्ये आधुनिकीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.
- रुग्णालयासाठी आग प्रतिबंधक योजना आवश्यक असून त्यासाठी ३ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आलेली आहे.

- राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयात सध्या ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो तो १०० विद्यार्थी पर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित आहे. MCI च्या मागणीनुसार महाविद्यालयासाठी एक अद्ययावत ऑडीटोरियम यावर्षी उभारण्याचे प्रस्तावित आहे.

- अपंगाना वैद्यकीय उपचारासाठी होणारा खर्च न परडवणारा असतो. काही अपंगांना नियमितपणे महागडी औषधे घ्यावी लागतात. ही बाब त्यांना परवडणारी नसते. म्हणून या कार्यक्रमाअंतर्गत अपंगांना विर्निदिष्टपणे (Specefically) आवश्यक असलेली औषधे पुरवठा करणेसाठी महापालिका क्षेत्रात विशेष केंद्र उभारणेत येणार आहे.

४ **राष्ट्रीय नागरी आरोग्य कार्यक्रम (NUHM)** :

- ५० हजार लोकसंख्येसाठी १ आरोग्य केंद्र निर्माण करण्यासाठी आर्थिक तरतुदीनुसार टप्प्या टप्प्याने कार्यक्रम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

- अडीच लक्ष लोकसंख्येसाठी १ रुग्णालय निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

- १०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय उभारणी करण्याचा मनोदय आहे.

- ५० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालयाची उभारणी करणेत आली असून ते रुग्णालय लवकरच कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

- प्रसुतिगृहांसाठी शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

- महापालिका क्षेत्रामध्ये कार्डिॲक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करण्याचे धोरण हाती घेतलेले असून, माहे मार्च २०१४ अखेर ठाणे शहराला २ सुसज्ज कार्डिॲक ॲम्ब्युलन्स २४ तास उपलब्ध होतील.

- **कम्युनिटी हेल्थ सेंटर** :- शहरातील HIV या असाध्य रोगाने त्रस्त असलेल्या रुग्णांना औषधोपचार घेता यावा याकरीता महापालिकेच्या उपलब्ध वास्तुमध्ये एक स्वतंत्र सल्ला व उपचार केंद्र चालू करणेचा मानस आहे. सुरुवातीस एच.आय.व्ही रुग्णांवर उपचार करण्यासाठी विशिष्ट केंद्राची उभारणी करणेत येणार आहे. त्यासाठी **रु.२० लक्ष** रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

- **डायलेसीस सेंटर** :- शहरातील किडनीच्या आजाराने ग्रस्त रुग्णांना डायलेसीस करुन घेणे शक्य व्हावे म्हणून सेवाभावी संस्थांच्या सहभागाने महापालिका क्षेत्रात पाच डायलेसीस सेंटर सुरु करण्याचा मानस आहे. यामध्ये रुग्णांकडून रु.२००/- प्रमाणे दर आकारून ही सेवा पुरविणेत येईल. या योजनेअंतर्गत सेवाभावी संस्थांना जागा उपलब्धत करण्यांत येऊन पाणी व विज आकार महापालिकेमार्फत भरण्यात येईल.

या सवलतीसाठी **रु.५० लक्ष** तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे.

५. **स्मशानभूमींचा एकात्मिक विकास/ विस्तार कार्यक्रम** : ठाणे महापालिका क्षेत्रात सध्या कार्यरत असलेल्या एकूण ३७ महापालिकेच्या स्मशानभूमी व खाजगी संस्थेमार्फत कार्यरत

असलेल्या एकूण २१ स्मशानभूमी या सर्व जागा अंत्यसंस्कारासाठीच्या जागा म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. सदर स्मशानभूमींपैकी ठाणे महापालिकेच्या अधिपत्याखाली असलेल्या एकूण ३७ स्मशानभूमींचा एकात्मिक स्मशानभूमी विकास कार्यक्रम ठाणे महापालिकेने हाती घेतला असून, यासाठी सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात अंदाजे **रु.९ कोटी** पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. तसेच खाजगी स्मशानभूमी, दफनभूमी कब्रस्थान सार्वजनिक कामासाठी वापराची असल्याने महानगरपालिकेने खर्च करावा असे प्रस्तावित करण्यांत येत असून त्याबाबत मा. महासभेने निर्णय घेणे आवश्यक आहे.

६. **एम.सी.टी.एस. (M.C.T.S) सुविधा** :

आरोग्य विभागाकडून राबविणेत येणा-या विविध राष्ट्रीय कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेषतः गरोदर माता व नवजात शिशु यांच्या आरोग्यासंदर्भातील कार्यक्रमाचा लाभ या शहरातील सर्वच नागरीकांचा होण्यासाठी महापालिका क्षेत्रामध्ये १३ Kiosk Centers व मुख्यालयात १ नियंत्रण कक्ष निर्माण करुन, संगणकीय यंत्रणेद्वारे विविध सेवा नागरीकांना देण्यासाठी व प्रत्येक लाभार्थी शोधण्यासाठी एम.सी.टी.एस. सुविधा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. या लेखाशिर्षांतर्गत **रु.२५ लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

७. **अत्याधुनिक कत्तलखाना उभारणी करणे** :

कौसा येथील आरक्षित भुखंडावर अत्याधुनिक कत्तलखाना उभारणी करणेचे प्रस्तावित आहे. यासाठी केंद्र शासनाकडून रु.१५ कोटी पर्यंत अर्थसहाय्य मिळणेसाठी प्रयत्न सुरु आहेत.

**VI आपत्कालीन व्यवस्थापन :**

१ **प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष** : नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीमध्ये जलद व प्रभावी प्रतिसाद मिळून जीवन आणि मालमत्ता यांची कमीत कमी हानी व्हावी या दृष्टिकोनातून जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेचे प्रस्तावित असून अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज Emergency Operation Centre स्थापन करणे, पूर परिस्थिती उद्‌भवणा-या ठिकाणी High End Camera बसविणे व अत्यावश्यक प्रतिसाद संदेश वहन खरेदी करणेचे प्रस्तावित आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षात **रु. ४ कोटी ५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

२ **अग्निशमन सेवा सुधारणा** : सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अग्निशमन विभागाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्याकरीता वाहने व साधन सामुग्री खरेदी मध्ये एकूण **रु. ९ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**VII समाज कल्याण :**

१ **महिला व बाल कल्याण कार्यक्रम** : महिला व बालकल्याण कार्यक्रमांतर्गत महिला बालकल्याण समितीमार्फत सन २०१४-१५ ते २०१८-१९ या आर्थिक वर्षांसाठी पंचवार्षिक योजना तयार करण्यांत आली असून महिला व बालकल्याण योजनेचे धोरण जाहीर करण्यात आले आहे.

प्रभाग समिती निहाय बचत गटांच्या समाज विकास संस्था तयार करण्यात येऊन त्यांच्यामार्फत महिला बाजार केंद्र ही नविन संकल्पना पंचवार्षिक धोरणात प्रस्तावित करण्यात आली आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात महिला व बाल कल्याण कार्यक्रमांतर्गत **रु. २० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **अपंगांसाठी कल्याणकारी योजना** | : | महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ३% रक्कम ही अपंगांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च होणे बंधनकारक आहे.<br>मतिमंद, १००% अंध व १००% नि:समर्थ व्यक्तींना उदर निर्वाहासाठी प्रतिमहा रु.१५००/- सहाय्यक अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे. अशी नाविण्यपुर्ण योजना पंचवार्षिक धोरणात प्रस्तावित आहे.<br>सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून महापालिकेच्या सर्व विभागांमार्फत अपंगांसाठी करण्यांत येणारी सर्व कामे ही समाज विकास विभागाकडील अपंगांसाठी कल्याणकारी योजना या लेखाशीर्षामधूनच करणेचे प्रस्तावित आहे. अपंगांसाठी कल्याणकारी योजनांतर्गत सन २०१४-१५ ते २०१८-१९ या आर्थिक वर्षांसाठी पंचवार्षिक धोरण लवकरच जाहिर करण्यांत येणार आहे.<br>सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अपंगांसाठी कल्याणकारी योजनांतर्गत **रु.८.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. |
| ३ | **मागासवर्गीय कल्याण** | : | महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी अंदाजपत्रकात महापालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता शिल्लक उत्पन्नाच्या ५% निधी राखीव ठेवणे आवश्यक आहे. |

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात स्पीलओव्हरसह मागासवर्गीय निधी अंतर्गत विविध विभागांतर्गत एकूण **रु.५९ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

४ **क्रिडा धोरण** :

- शासनाच्या क्रिडा धोरणाच्या धर्तीवर ठाणे महापालिकेचे स्वत:चे क्रिडा धोरण तयार करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केले आहे.
- क्रिडा धोरणामधील खेळ व खेळाची अंमलबजावणी करण्यासाठी क्रिडा धोरणामध्ये क्रीडा संकुल, मिनी क्रिडा संकुल, ओपन स्पेस व बागबगीचे आधुनिक पध्दतीने तयार करण्यात येतील. त्यांची वर्गवारी अ, ब, क आणि ड अशी करण्यात येईल.
- महापालिकेने तयार केलेल्या सर्व क्रीडा विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांचे सभासदत्व व आरक्षण केंद्रीकृत व Web Based पध्दतीने करण्यासाठी संगणकीकरण करण्यात येणार आहे.
- या धोरणामध्ये विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय अधिकृत संघटनांना महापालिकेकडे असलेल्या सर्व क्रिडा विषयक सुविधा ठराविक कालावधीसाठी खेळाडूंचे प्रशिक्षण व विविध क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली आहे.
- ठाणे महानगरपालिकेच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग किंवा प्राविण्य मिळविणाऱ्या जिल्हा व राज्य खेळाडूस ठाणे गौरव / आंतरराष्ट्रीय खेळाडूस ठाणे खेळ रत्न

असे पुरस्कार देण्यात येतील. त्याचप्रमाणे हे पुरस्कार प्रशिक्षकांनाही देण्यात येतील. असे पुरस्कार चषक व रोख पारितोषिकाचे स्वरुपात देण्यात येतील.

- क्रीडा धोरणाची अंमलबजावणी करणेकरीता क्रीडा सेल (कक्ष) ची स्थापना करण्यात आली असून या क्रीडा धोरणाच्या अंतर्गत होणारे सर्व प्रकल्प क्रीडा सेलच्या माध्यमातूनच सुरु राहतील. या प्रकल्पांची स्वच्छता, देखभाल व दुरुस्ती व ठराविक कालावधीसाठी अभिकर्ता नेमण्याची कार्यवाही प्रस्तावित असून या व्यतिरीक्त कोणत्याही प्रकारे खाजगीकरण केले जाणार नाही अथवा ते चालविण्याकरिता देण्यात येणार नाही. आपल्या नागरीकांना आपण ठरवून दिलेल्या दराप्रमाणे या सर्व सुविधा वापरण्याचे अधिकार कोणत्याही परिस्थीतीत सौम्य / कमी होणार नाही या तत्वाला धरुनच या सर्व प्रकल्पांचे संचालन करण्यांत येईल.

या लेखाशिर्षांतर्गत **रु.३६.२० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## VIII जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान (JNNURM)

**१. भुयारी गटार योजना टप्पा १,२ व ३** : टप्पा क्र.१ अंतर्गत २ निविदा, टप्पा क्र.२ अंतर्गत ४ निविदा व टप्पा क्र.३ अंतर्गत १ निविदा अशा एकूण ७ निविदांमार्फत कामे प्रगतीपथावर आहेत. प्रस्तुत प्रकल्पाच्या टप्पा क्र.१ अंतर्गत ९७%, टप्पा क्र.२ अंतर्गत ४२% व टप्पा क्र.३ अंतर्गत ८२% एवढी भौतिक प्रगती झालेली असून, पुढील वर्षी ही सर्व कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी एकूण **रु.७२.८९ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| २. | **भुयारी गटार योजना टप्पा ४** | भुयारी गटार योजना टप्पा ४ अंतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा व घोडबंदर रोड (मानपाडयापासून गायमुख) पर्यत या कामाचा समावेश करण्यात आला आहे. त्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, मंजूरीची कार्यवाही सुरु आहे. या लेखाशिर्षांतर्गत **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. |
| ३. | **बी.एस.यु.पी.योजना** | केंद्र शासन, राज्य शासन आणि ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जेएनएनयुआरएम अंतर्गत बीएसयुपी योजनेच्या माध्यमातून ८ क्लस्टर झोन मध्ये ७७४५ सदनिका मंजूर करण्यात आलेल्या आहेत. या अंतर्गत प्रकल्प - १ मध्ये ४६२१, प्रकल्प - २ मध्ये ८२२, प्रकल्प - ३ मध्ये ११६० व प्रकल्प - ४ मध्ये ११४२ एवढया सदनिका उपलब्ध होणार आहेत. सन २०११-१२ मध्ये प्रकल्प - २ अंतर्गत ८२२ सदनिकांचे बांधकाम पुर्ण करण्यात आले असून, सदरच्या सदनिका लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. टप्पा क्र.१, ३ व ४ अंतर्गत सदनिकांचे बांधकाम मार्च-२०१५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी एकूण **रु.२१२.३९ कोटी** तरतूद करण्यात आली आहे. |
| ४. | **जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत नवीन विकास कामे** : | जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागाकडील नविन विकास कामे हाती घेण्यात येणार असून, त्या अंतर्गत उत्तरेकडील वर्तकनगर व घोडबंदर परिसरातील व पुर्वेकडील मुंब्रा परिसरातील पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग व मलनिःसारण अंतर्गत भुयारी गटार योजना, टप्पा क्र. ४ अंतर्गत दिवा व घोडबंदर रोड (मानपाडा |

पासून गायमुख) पर्यंत या कामाचा समावेश आहे. सदर बाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, जे.एन.एन.यु.आर.एम. कडे अंतिम मंजुरीची कार्यवाही सुरु आहे. यासाठी एकूण **रु.५ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**IX परिवहन सेवेस अनुदान :** ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेस जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत २३० बसेस व पायाभुत सुविधांसाठी एकूण १४०.५० कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून मंजूर झाला आहे. या बसेस खरेदी करणेकरीता निविदा प्रक्रिया सुरु असून मंजूर झालेल्या बसेस लवकरच ठाणेकर नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. यासाठी सन १३-१४ मध्ये रु.६.५० कोटी व सन २०१४-१५ साठी रु.१२४ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. या मध्ये केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान देखील प्राप्त होणार आहे.

- परिवहन सेवेच्या बसेसमध्ये इलेक्ट्रॉनिक तिकिट व्हेंडींग मशीन (ETVM) ही यंत्रणा लवकरच कार्यान्वित करण्यांत येणार आहे.

- सध्या परिवहन सेवेकडील फक्त १८० ते २०० बसेस नागरीकांच्या सेवेसाठी रस्त्यावर धावतात. कोणत्याही शहराची गरज सर्वसाधारणपणे प्रत्येक एक लक्ष लोकसंख्येसाठी ४० बस या प्रमाणे असते. शहराची २० लक्ष लोकसंख्या विचारात घेता ठाणे शहरासाठी ८०० बसेसची गरज आहे. म्हणजेच आपल्याला आणखी ६०० बसेसची आवश्यकता आहे. सन २०१४-१५ या वर्षामध्ये प्रशासनास २०० वरुन ६०० पर्यंत बसेस

वाढविण्याचा मनोदय आहे. यापैकी २३० बसेस JNNURM कार्यक्रमा अंतर्गत उपलब्ध होणार आहेत. या व्यतिरीक्त जनरल कॅश कॉन्ट्रॅक्टवर खाजगी अभिकर्त्याकडून २०० बस चालविणेचे प्रस्तावित आहे.

- परिवहन सेवेच्या बसेसची उत्पादन क्षमता वाढविणेसाठी व बसेसवर योग्यरित्या नियंत्रण ठेवणेसाठी Web based GIS Vehical Traking Monitoring & Survellance System (VTMSS ) बसविणेबाबत केंद्र शासनाने अनुक्रमे ३.४८ कोटी व ४ कोटी मंजूर केले असून त्याबाबतची निविदा प्रक्रिया ठाणे महानगरपालिकेच्या संगणक विभागामार्फत चालू आहे.

- महिला प्रवाशांसाठी ५% महिला विशेष बसेस २४ तास चालू ठेवणेबाबत प्रस्तावित आहे. सुरुवातीस ५% बसेस, JNNURM अंतर्गत बस उपलब्ध झाल्यानंतर १०% व टप्या टप्प्याने २५% बसेस महिलांसाठी राखीव ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. म्हणजेच सरसकट ५०% बसेस महिलांसाठी राखीव होतील.

- बस थांब्यांचे आधुनिकीकरण :- शहरातील अस्तित्वातील बस थांब्यांवर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन दिल्यास नागरीकांना महापालिकेची विविध सेवा विषयक कामे प्रवास करताना करता येतील. उदा. एटीएम सुविधा, मालमत्ता कर भरण्याची सुविधा, मासिक पास सुविधा इ. प्रामुख्याने अपंग व्यक्तींना काम उपलब्ध करुन देण्याचे धोरण आहे.

यासाठी नागरी परिवहन निधी अंतर्गत **रु. २५ कोटी** व JNNURM अंतर्गत बसेस खरेदीसाठी **रु.१२४ कोटी** असे एकूण परिवहन सेवेच्या सुधारणेसाठी एकूण **रु.१४९ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**X प्रशासकीय कामकाजात सुधारणा :**

**१. आस्थापना विषयक सुधारणा :**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विविध संवर्गातील पदे मंजूर असून त्यांचे सेवा नियम ( Recruitment Rules ) सद्य:स्थितीतील मानवी संसाधनामध्ये झालेल्या प्रगतीचा विचार करता कालबाहय झालेले आहेत. त्यामुळे सद्या अस्तित्वातील सेवा नियमात बदल करण्याचे प्रस्तावित आहे. हे सेवा नियम नव्याने करण्यांत येणा-या भरती पदांना लागू राहतील.

ठाणे महानगरपालिकेतील आरक्षक भरतीचा अनुभव पाहता जवळपास ३८० पदांच्या भरतीसाठी ७०,००० पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्याने भरती प्रक्रिया महापालिकेतर्फे करणे केवळ अशक्य असल्याने यापुढील आरक्षक भरती महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाला विनंती करुन पोलीस भरतीवेळी त्यांच्यामार्फत करण्याची शिफारस करीत आहे. यामुळे महापालिकेचा निधी तर वाचेलच पण सर्व गरीब आणि गरजू उमेदवारांना मानसिक त्रास पण होणार नाही. कारण हे सर्व उमेदवार सर्वसाधारणपणे पोलिस आणि इतर यंत्रणा व संस्थांमध्ये भरतीसाठी देखील प्रयत्न करतात. प्रत्येक प्रयत्नामागे त्यांचेवर खर्चाचा आर्थिक भार पडतो आणि शारीरीक व मानसिक त्रास देखील होतो.

महानगरपालिकेतील विविध पदांची भरती ही एकाच वेळी करण्यांत येत असल्याने कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये अडचणी

निर्माण होत आहेत. तसेच एकाच वेळी भरती झालेले कर्मचारी बहुतांशी एकाच वेळी सेवानिवृत्त होणा-या रिक्त पदांमुळे प्रशासनामध्ये अडचणी येत असल्याने यापुढे रिक्त होणारे पद प्रत्येक तिमाहीमध्ये भरती करण्याचे नियोजित आहे. तसेच यापुढे सर्व पदांची भरती ही ऑन लाईनपद्धतीने करण्याचे प्रस्तावित आहे.

- महापालिका कर्मचा-याच्या कुटुंबाची त्याच्या मृत्यूनंतर होणारी सामाजिक व आर्थिक परवड टाळण्यासाठी कर्मचा-यांचा सामायिक विमा उतरविण्याची योजना कार्यान्वित करण्याचा मानस आहे. या योजनेअंतर्गत सहभागी होणा-या कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून ठराविक रक्कम कपात करुन विमा उतरविणा-या कंपन्याकडून स्पर्धात्मक दर घेऊन विमा योजना राबविण्यात येईल. यामुळे कर्मचा-याच्या कुटुंबावर येणारी आपत्ती काही अंशी दूर होण्यास मदत होईल.

**२. संगणकीकरण** : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिकेमध्ये संगणक विभागामार्फत सर्व विभागांचे संगणकीकरण करणेसाठी भरीव पावले उचलण्यांत आलेली आहेत. सदर आर्थिक वर्षात जी.आय.एस.प्रणाली कार्यान्वित करण्यांत आली असून त्यातील Atrribute माहिती भरण्याचे, सर्व मालमत्तेचे Ground Truthing करुन त्यांची माहिती गोळा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. आर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिकेचे स्वतःचे डाटा सेंटर व्रज व्हॅली , कोलशेत या सुविधा भूखंडावर तयार करुन त्यामध्ये अद्ययावत व तांत्रिक दृष्टया सक्षम प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

महापालिकेचे मुख्य कार्यालय व सर्व प्रभाग कार्यालय यांना नेटवर्कींगद्वारे जोडण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

पुढील आर्थिक वर्षात डाटा सेंटर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करुन मुख्यालय व सर्व प्रभाग कार्यालये यांची नेटवर्कींगद्वारे जोडणी करुन महापालिकेचे संगणकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा असलेला टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे. सदर नेटवर्कींग व डाटा सेंटर मुळे सद्यस्थितीत सर्व प्रभाग समित्या एकमेकांना जोडून मालमत्ता भरण्याची यंत्रणा लवकरच ऑनलाईन करण्यात येणार आहे. महापालिकेच्या संगणकीय कामकाजासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक , सर्व विभागांच्या नस्त्यांचे स्कनिंग व डिझीटलायझेशन करण्याचे प्रस्तावित आहे.

सर्व नागरिक व नगरसेवक व अधिकारी यांच्या मागण्या व तक्रारींची ऑनलाईन नोंद व पाठपुरावा याकरीता कॉल सेंटर उभारणेसाठी निविदा काढण्यांत आलेल्या असून त्याद्वारे नागरिक व नगरसेवक यांना त्यांच्या मागण्या व तक्रारींचा ऑनलाईन पाठपुरावा करणे शक्य होणार आहे. कर्मचा-यांच्या हजेरीवर नियंत्रण ठेवणेसाठी फेस रिडर बायोमेट्रीक सिस्टिम बसविण्याचे , तसेच महापालिकेच्या सर्व विभागांचे कामकाज संगणकीकृत व पेपरलेस करण्याच्या दृष्टिने ई ऑफिस ही NIC ची संगणक प्रणाली वापरात आणण्याचे , छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे संपूर्णतः संगणकीकरण व नेटवर्कींग करण्याचे तसेच महापालिकेचे संपूर्णतः संगणकीकरण करण्यासाठी ERP प्रणाली कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावित आहे.

- महानगरपालिका सदस्यांना सभेच्या सुचना व इतर कार्यक्रमासाठी दयावयाची निमंत्रणे वेळेत मिळणेसाठी महापालिकेतर्फे टॅब पुरविण्यात येऊन इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे. त्यामुळे स्टेशनरी, मनुष्यबळ व वेळेची बचत होणार आहे. तसेच नगरसेवकांना महापालिका संकेतस्थळावर संपर्क करणे सुलभ होणार आहे. तसेच नगरसेवक निधीच्या कामासाठी किंवा इतर निधीतील कामे करणेसाठी त्यांना मनपा प्रशासनाशी संपर्क करणे सोपे होऊन त्यांनी सुचविलेली कामे कोणत्या टप्प्यात आहेत याची माहिती वेळीच (Real Time) उपलब्ध होणार आहे.

संगणकीकरणासाठी एकूण **रु. १६ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**आभार :**

भारताचे मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान, सार्वजनिक रिन्युवेबल एनर्जी, सोलार सिटी, बी.एस.यु.पी, राजीव आवास योजना आणि अन्य कार्यक्रमांच्या माध्यमातून ठाणे शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले आहे त्यांचे कृतज्ञतापुर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, मा.उपसभापती, विधान परिषद, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार, मा.मुख्य सचिव , महानगर आयुक्त आणि विशेषतः नगर विकास विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव तसेच शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत पुरोगामी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना प्रोत्साहीत करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा.गटनेते , सर्व नगरसेवक व सर्व पक्षांचे मा.लोकप्रतिनिधी यांचे मन:पुर्वक आभार व्यक्त करतो.

ठाणे महानगरपालिकेच्या या सर्व कार्यक्रम अंमलबजावणीसाठी सक्रीय सहभागी असलेले व सांघिक वृत्तीने काम करणारे अतिरीक्त आयुक्त श्री. श्यामसुंदर पाटील, विविध विभागातील विभाग प्रमुख व अधिकारी आणि कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे मी आभार मानतो. मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. सुधीर नाकाडी, सौ. अर्चना निपुर्ते व लेखा विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी यांनी हे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. त्यामुळे त्यांचे व इतर सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी त्यांचेही मी आभार मानतो.

या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्तावित केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणि धोरणांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टिने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.महासभेस शिफारस करणेसाठी आपल्याकडे सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

**सस्नेह धन्यवाद ! जय हिंद !!**

**असीम गुप्ता**
**महापालिका आयुक्त**